




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २३२ •शुक्रवार, दि.२१ नोव्हेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रुपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955







# १४ जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची नव्यानं सोडत

## निवडणूक आयोगाच्या मोठ्या हालचाली सुरू

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी जाहीर झालेल्या आरक्षणामध्ये ४४ नगरपरिषदा, ११ नगरपंचायती, २० जिल्हा परिषद आणि २ महापालिकांमध्ये (नागपूर, चंद्रपूर) ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेलेली आहे.याबाबत येत्या (२५ नोव्हेंबर रोजी सर्वोच्च




न्यायालयात सुनावणी होणार आहे.मात्र त्यापूर्वीच जिथे ५० टक्क्यांहून अधिक आरक्षण झाले आहे, ते कमी करण्याची तयारी राज्य निवडणूक आयोगाने दाखवली आहे. त्याचवेळी जिथे ५० टक्क्यांच्या आत आरक्षण आहे अशा २३३ नगरपरिषद-नगरपालिकांमध्ये जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार (२ डिसेंबर) निवडणुका होऊ देण्यासाठी राज्य निवडणूक आयोग प्रयत्नात असल्याचे समजते.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त असू नये, असे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश होते. मात्र ही मर्यादा ओलांडली असल्याचा दावा करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. यावर सोमवारी (१७ नोव्हेंबर) सुनावणी पार पडली. यात न्यायालयाने अधिकारी आणि राज्य सरकारवर ताशेरे ओढले.यानंतर आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही याची खबरदारी घेण्याचे निर्देश न्यायालयाने आयोगाला दिले आहेत. तसेच बांठिया आयोगाच्या पूर्वी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कसे आरक्षण होते आणि आता जाहीर झालेले आरक्षण कसे आहे याची तौलनिक माहिती देण्याचे आदेश दिले आहेत. ही माहिती आयोग सर्वोच्च न्यायालयात सादर करणार आहे.

२० जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणात वाढ : राज्यातील एकूण २० जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा आरक्षण वाढले असल्याची माहिती आहे. एकूण ३४ जिल्हापरिषदांमध्ये जाहीर झालेल्या २०११ जागांमध्ये एकूण ५४ टक्के आरक्षण जाहीर झाले आहे. त्यामध्ये खुल्या वर्गासाठी ९३४ जागा, अनुसूचित जातीसाठी २४६ जागा, अनुसूचित जमातीसाठी ३०६ जागा आणि ओबीसीसाठी ५२६ जागांसाठी आरक्षण जाहीर झाले आहे.

एकूण आरक्षित जागा १०७७ असून हे प्रमाण ५४ टक्के इतके आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

# मनोज जरांगे पाटलांकडून आता मोठी मागणी

## सरकारला १० दिवसांचा अल्टिमेटम, ..तर संपूर्ण राज्य बंद करण्याचा इशारा

**मालेगाव । प्रतिनिधी**

मालेगावमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे, मालेगावमध्ये एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून, दगडाने तिचं डोकं ठेचून हत्या करण्यात आली, या घटनेनं राज्यभरात खळबळ उडाली असून, संताप व्यक्त करण्यात येत आहे, आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी होत आहे. दरम्यान आज मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पीडित कुटुंबाची भेट घेतली आहे. यावेळी पीडितेच्या वडिलांनी आपली व्यथा मनोज जरांगे पाटील यांच्यासमोर मांडली, आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी कुटुंबाकडून करण्यात आली आहे. या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना आता मनोज जरागे पाटील यांनी मोठी मागणी केली आहे. मुख्यमंत्री, महोदय दोन महिन्याच्या आत कायदा करा आणि आरोपीला फाशी द्या, नाहीतर त्याचा एन्काऊंटर करा अशी मागणी यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.

मुख्यमंत्री, महोदय दोन महिन्याच्या आत कायदा करा, आणि आरोपीला फाशी द्या, नाहीतर त्याचा एन्काऊंटर करा. लाडकी लेक म्हणतात, लाडकी बहीण म्हणतात तर त्यांना न्याय द्या. न्याय देता येत नसेल तर तुमचे तोंड काळे करा. दोन महिन्याच्या



आत न्याय न दिल्यास संपूर्ण महाराष्ट्र रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा थेट इशाराच यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, कायद्यात बदल करा, काहीही करा, पण न्याय द्या. येत्या मंगळवारी कॅबिनेट बैठकीमध्ये कायद्यात दुरुस्ती करा, बाल लैंगिक सुधारणा कायद्यात दुरुस्ती करा, पीडितेच्या नावाने कायदा करा. या प्रकरणात उज्वल निकम यांची वकील म्हणून नियुक्ती करा, अशी मोठी मागणी या प्रकरणात जरांगे पाटील यांनी केली आहे.

महिन्याच्या आत चार्जशीट दाखल करा, आणि त्या आरोपीला फाशीची शिक्षा द्या. न्याय न दिल्यास तुम्ही निर्दयी मुख्यमंत्री आहात असं आम्ही समजू, मालेगाव, नाशिकसह संपूर्ण ▶▶ उर्वरित पान २ वर

# स्थानिक गुन्हे शाखेने परळीत सव्वा लाखाचा गांजा पकडला

**बीड । प्रतिनिधी**

परळी ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतून स्थानिक गुन्हे शाखेने कापसाच्या शेतात लावलेला गांजा जप्त केला आहे. या धाडीत सव्वा लाखांचा मुद्देमाल जप्त करून एकावर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

युवराज आंधळे यांची हेळंबमध्ये गट क्रमांक ७४६ मध्ये शेती असून त्यांनी आपल्या शेतात कापसासोबत गांज्याची देखील लागवड केली होती.स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांना पेट्रोलिंग करत असताना याबाबत माहिती



मिळाल्यावरून त्यांनी शेतात जात पाहणी केली. यावेळी शेतात कापसासोबतच गांज्याची देखील लागवड झाल्याचा प्रकार समोर आला.पोलिसांनी छापा मारून २५.९५० ग्रॅम गांजा जप्त केला.या कारवाईत १ लाख २९ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपी फरार झाला आहे.परळीच्या ग्रामीण पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.सदर कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर ▶▶ उर्वरित पान २ वर

# तुतारीकडून प्रचाराचा शुभारंभ

## मतदारांचा उत्साह बीडच्या विकासाला नवी दिशा देणार :आ.संदीप क्षीरसागर



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराचा, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून शुभारंभ करण्यात आला. शहरातील प्रभाग क्रमांक २ आणि प्रभाग क्रमांक १८ मध्ये कॉर्नर बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी,मतदारांमध्ये दिसणारा ▶▶ उर्वरित पान २ वर

### •मनोज मस्के यांचा राष्ट्रवादी काँग्रेस श.प. पक्षात जाहीर प्रवेश

**प्रभाग क्रमांक १४ मधून उमेदवार असलेले बीड शहरातील संत नामदेव नगर येथील मनोज मस्के हे गेल्या २५ वर्षांपासून माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर, डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांचे कार्यकर्ते आहेत. त्यांनी आ.संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन गुरुवारी (दि.२०) रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. दरम्यान ते त्यांनी दाखल केलेला उमेदवारी अर्ज मागे घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना (उ.बा.ठा.) पक्षाच्या उमेदवारांसाठी काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या प्रवेश कार्यक्रमावेळी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

# महिलांनी शेवटी लढा जिंकला; आहेर धानोरा गावातील पूजा बिअर बार बीड जिल्हा न्यायालय कायमस्वरूपी केले बंद

## सरपंच सौ. मोनिका बालासाहेब इंगोले यांच्या आंदोलनाला यश

**बीड । प्रतिनिधी**

महिलांच्या विरोधात दारू दुकान बंद आहे धानोरा बीड पासून जवळच असलेल्या परवानाधारक पूजा बियर बार दुकाना बाबत गावातील अनेक महिलांनी व सरपंच सौ .मोनिका बालासाहेब इंगोले यांनी वारंवार जिल्हाधिकारी व मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन देऊन तसेच कोर्टामध्ये अपील करून आहेर धानोरा येथील पूजा बियर बार बंद करण्याचे आदेश




बीड जिल्हा न्यायालयाने दिले. याबाबत सविस्तर माहिती अशी की, आहे धानोरा येथील गावातील महिलांनी कडाडून विरोध केला. यात प्रदीर्घ न्यायालयीन लढाई लढून अखेर बियर बार चे दुकान परवानाधारक बंद केले यासाठी स्थानिक स्तरावर आंदोलन सुद्धा केले. मात्र दारूचे परवानाधारक दुकान बंद करायचे कसे असा प्रश्न या महिलांसमोर उभा राहिला होता , सदर गंभीर विषय गावकरी महिलांनी बीड जिल्ह्याचे पालक मंत्री अजित दादा पवार यांच्या समोर ही मांडला व दारूबंदी महिलांची मागणी पाहता राज्य ▶▶ उर्वरित पान २ वर

# अंबाजोगाईत आतापर्यंत १९ उमेदवारांची नगर परिषद निवडणुकीतून माघार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये गुरुवार, दि. २० नोव्हेंबर रोजी एकूण १९ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. त्यामध्ये नगराध्यक्ष पदासाठी १ आणि नगरसेवक पदासाठीच्या १८ उमेदवारांचा समावेश असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे, तहसीलदार विलास तरंगे आणि मुख्याधिकारी प्रियांका टोंगे यांनी दिली. शुक्रवारी (दि.२१) अर्ज मागे




घेण्याचा शेवटचा दिवस असून आणखी किती उमेदवार निवडणुकीतून बाहेर ▶▶ उर्वरित पान २ वर

# भाजीपाला घेत असताना भर बाजारात तलवारीने हल्ला करत एकाची हत्या, जालना शहर हादरलं

**जालना । प्रतिनिधी**

शहरात धक्कादायक घटना घडली आहे. शहरातील नूतन वसाहत भागात एका ४५ वर्षीय व्यक्तीवर तलवारीने हल्ला करुन हत्या करण्यात आल्याची घटना घडली आहे. बाबासाहेब सोमधाने असं मृत्यू झालेल्या वक्तीचे नाव आहे. बाबासाहेब सोमधाने हे भाजीपाला घेत असताना



चारचाकी वाहनात आलेल्या तीन जणांकडून भर बाजारात तलवारीने त्यांच्या हल्ला करण्यात आला. यामध्ये त्यांचा मृत्यू झाला आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. यानंतर पोलिसांनी लगेच या प्रकरणाचा तपास सुरु केला आहे. पोलिसांनी तीन संशयितांना ताब्यात देखील घेतलं आहे. जुना वाद आणि जमिनीच्या ▶ उर्वरित पान २ वर

### पोलिसांची छापेमारी सुरू असताना मटका सुरू

# एकास पकडले, मटका किंग गणेश खराडेसह दोघांवर गुन्हा

**केज । प्रतिनिधी**

केजचे सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांनी मटका जुगार आड्यावर छापेमारी करून मटका बुक्या सुरू ठेवल्याने पोलिसांनी एकास पकडले. त्याच्याकडून मटका जुगाराचे साहित्य, नगदी रक्कम व मोबाईल जप्त केला. याप्रकरणी मटका किंग गणेश खराडेसह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. केज शहरात व ग्रामीण भागात मटका किंग गणेश खराडे याने मटका जुगाराचे जाळे पसरविले आहे. मटका बुक्या राजरोसपणे सुरू असल्याचे निदर्शनास येताच केजचे सहाय्यक पोलीस निरीक्षक वेंकटराम यांनी अंबाजोगाईच्या पोलिसांच्या मदतीने शहरात छापेमारीचे सत्र सुरू केले होते. ▶ उर्वरित पान २ वर

# वाळू माफियांना दणका! तब्बल सव्वा कोटीचा मुद्देमाल जप्त, पंढरपूरमध्ये पोलीस अधिकाऱ्यांची कारवाई



**पंढरपूर । प्रतिनिधी**

प्रशासन निवडणुकीच्या धामधुमीत अडकलेले असताना वाळू माफियांनी भीमा नदी पात्रात जोरदार बेकायदा वाळू उपसा सुरू केला होता. मात्र याची माहिती समजतात पंढरपूरचे डीवायएसपी असणारे आयपीएस अधिकारी प्रशांत डगळे यांनी छापे टाकत तब्बल सव्वा कोटी रुपयांच्या मुद्देमाल जप्त केला आहे. यामुळे वाळू माफियांचे कंबरडेच मोडले असून डगळे यांनी पोलीस प्रशासनाला अवैध वाळू उपशावर कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत.

पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे आणि शेळवे येथील भीमा नदीपात्रात जेसीबीच्या साह्याने मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू असल्याची माहिती आयपीएस अधिकारी प्रशांत डगळे यांना मिळाली होती. यानंतर तातडीने डगळे यांनी पोलिसांच्या पथकासह गुरसाळे व शेळवे येथे छापा टाकत तब्बल सव्वा कोटीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत ५० ब्रास वाळू साठा जप्त करण्यात आला आहे. गुरसाळेत ५८ लाख ८० हजार तर शेळवेत ६७ लाख ८ हजार रुपये असा एकूण १ कोटी २५ लाख ८८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती प्रशांत डगळे यांनी दिली. या कारवाईमुळे भीमा नदी पात्रात रोज लाखोंचा वाळू उपसा करणाऱ्या माफीयांना आयपीएस अधिकारी प्रशांत डगळे यांनी जोरदार दणका दिला असून अवैध वाळू ▶▶ उर्वरित पान २ वर




# थंडीत हाडांची व सांध्यांची काळजी

हिवाळ्याच्या दिवसांमध्ये हाडे, सांधे आणि स्नायू यांच्याशी संबंधित तक्रारींचे प्रमाण वाढलेले दिसते. थंडीमुळे शरीरातील रक्ताभिसरण कमी होते, स्नायू आणि लिगामेंट्सचा ताठरपणा वाढतो, तसेच सांध्यांतील नैसर्गिक लुब्रिकेशन कमी होते. त्यामुळे सांधेदुखी, कडकपणा, स्नायूंचा ताण, तसेच जुन्या इजा किंवा ऑस्टियोआर्थ्रायटिससारख्या समस्या अधिक तीव्र होऊ शकतात.

### ● थंडीत का वाढतो त्रास ?

१. कमी तापमानामुळे ऊतींमध्ये रक्तप्रवाह कमी होतो, ज्यामुळे वेदना जाणवण्याची संवेदनशीलता वाढते. स्नायू आकुंचन पावतात आणि त्यांची लवचिकता कमी होते.


२. सांध्यातील सायनोव्हिअल फ्लूइड जाड होऊन हालचाली कठीण होतात.

३. ऑस्टियोआर्थ्रायटिस, रुमेटॉइड आर्थ्रायटिस, किंवा पूर्वीच्या इजांमध्ये थंडीत लक्षणे तीव्र होऊ शकतात.

### ● काळजी काय घ्यावी ?

१) शरीर गरम ठेवणे– योग्य थरांचे कपडे, हातमोजे, सॉक्स आणि गरम कपड्यांचा वापर करा. सांधे–विशेषत: गुडघे, खांदे व पाठ–थंड वाऱ्यापासून संरक्षित राहतील याची काळजी घ्या.

२) नियमित हलकी हालचाल आणि व्यायाम– स्ट्रेचिंग, वॉर्म–अप व्यायाम आणि हलक्या कार्डिओ क्रिया जसे ब्रिस्क वॉक, स्टेशनरी सायकलिंग इ. रोज कराव्यात. यामुळे: रक्ताभिसरण सुधारते, सांधे









अधिक लवचिक राहतात, स्नायूंची ताकद वाढते

३) संतुलित आहार– हाडे आणि सांध्यांच्या आरोग्यासाठी खालील घटक महत्त्वाचे आहेत: कॅल्शियम: दूध, दही, पनीर, तीळ, बदाम, व्हिटॅमिन ड: सकाळचे ऊन, अंडी, फॅटी फिश, प्रोटीन: डाळी, कडधान्ये, अंडी, मांस, सोया उत्पादने, ओमेगा–३ फॅटी ॲसिड: फिश, अळशी, अक्रोड – हे सांध्यातील सूज कमी करण्यात मदत करतात.

४) गरम पाण्याची शेक – स्नायूंच्या ताठरपणात किंवा हलक्या वेदनेत १०–१५ मिनिटांची हॉट फोमेंटेशन वेदना कमी करण्यास मदत करते.

अति तापमान टाळावे व त्वचेला इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.

५) पुरेशी झोप व स्ट्रेस मॅनेजमेंट– झोपेच्या कमतरतेमुळे वेदना संवेदनशीलता वाढते. दिवसात ७–८ तासांची झोप आवश्यक. योगा, डीप–ब्रीदिंग किंवा मेडिटेशन सांध्यांच्या वेदना व्यवस्थापनाला मदत करतात.

### ● कधी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा ?

खालीलपैकी कोणतेही लक्षण असल्यास ऑर्थोपेडिक तज्ज्ञांचा त्वरित सल्ला घ्यावा: तीव्र किंवा सतत वाढणारी सांधेदुखी, सूज,





लालसरपणा किंवा हालचालींमध्ये मोठी अडचण, रात्री वेदना वाढणे, चालताना अस्थिरता किंवा गुडघा लॉक होणे, फ्रोजन शोल्डरची लक्षणे, जुन्या इजेत अचानक वेदना वाढणे

डॉक्टर आवश्यकता भासल्यास एक्स–रे, MRI किंवा रक्ततपासण्या सुचवतात आणि परिस्थितीनुसार औषधोपचार, फिजिओथेरपी किंवा इतर उपचार पद्धती वापरतात. थंडी ही हाडांसाठी आव्हानात्मक असू शकते, परंतु योग्य काळजी, व्यायाम, आहार आणि वेळेवर केलेला उपचार यामुळे हाडे आणि सांधे उत्तम स्थितीत राहू शकतात. लक्षणे दुर्लक्षित न करता तज्ज्ञांचा सल्ला घेणे हीच सर्वात सुरक्षित आणि परिणामकारक पद्धत आहे.

**– डॉ प्रमोद शिंदे,**
**सह्याद्री ऑर्थोकेअर हॉस्पीटल, हॉटेल अन्विता समोर,**
**जालना रोड, बीड ,संपर्क ९५२७६६५१५१**

◆ पान १ वरून पुढे...

## १४ जिल्हा....

यामध्ये आदिवासीबहुल नंदुरबार १०० टक्के, पालघर ९३ टक्के, गडचिरोली ७८ टक्के, नाशिक ७१ टक्के, अमरावती ६६ टक्के, यवतमाळ ५९ टक्के यांचा समावेश आहे. मात्र या जिल्ह्यांमध्ये आदिवासींची लोकसंख्या अधिक असल्याने या जिल्ह्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण लागू आहे.मात्र, धुळे ७३ टक्के, चंद्रपूर ६३ टक्के, अकोला ५८ टक्के, नागपूर ५७ टक्के, ठाणे ५७ टक्के, गोंदिया ५७ टक्के, वाशिम ५६ टक्के, नांदेड ५६ टक्के, हिंगोली ५६ टक्के, वर्धा ५४ टक्के, जळगाव ५४ टक्के, भंडारा ५२ टक्के, लातूर ५२ टक्के, बुलडाणा ५२ टक्के या जिल्हा परिषदांमध्येही ५० टक्क्यांपेक्षा आरक्षण वाढले आहे.

## मनोज जरांगे...

राज्य बंद करणार आणि पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देणार असंही यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान पीडित कुटुंबियांनी दहा दिवसांची मुदत सरकारला दिली आहे. अकराव्या दिवशी जर मला बोलावले तर त्या कुटुंबासाठी मी केव्हाही रस्त्यावर उतरेल. कुटुंबीयांशी चर्चा करताना काही मागण्या आम्ही कागदावर नोट केल्या आहेत, त्या सर्व मुख्यमंत्र्यांकडे पाठवू आणि आरोपीला फाशीची शिक्षा देवू, असं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

## स्थानिक गुन्हे...

पोलीस अधीक्षक चेतना तिडके,उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड,परळी ग्रामीणचे प्रभारी सय्यद,पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने,अंकुश निमोणे,रियाज शेख, केकाण, जोगदंड, भताने, आंधळे, घोडके, मराडे यांच्यावतीने करण्यात आली.

## तुतारीकडून प्रचाराचा...

उत्साह हा बीडच्या विकासाला नवी दिशा देणारा आहे. असे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले. तसेच नगराध्यक्ष पदाचे उमेदवार असलेल्या सौ.स्मितताई विष्णू वाघमारे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि मित्रपक्ष शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सर्व उमेदवारांना मतदानरूपी आशीर्वाद देऊन विजयी करा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत, लोकांसाठी प्रामाणिक काम करणारे उमदेवार निवडून दिले आहेत. या उमेदवारांना मतदार निश्चितच स्वीकारणार आहेत. मतदार बांधवांमध्ये दिसणारा उत्साह हा बीडच्या विकासाला नवी दिशा देणारा आहे. असे आ.क्षीरसागर यांनी सांगितले. गुरुवार (दि.२) रोजी सायंकाळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रचाराला सुरुवात झाली. प्रभाग क्रमांक २ मध्ये नगरसेवक पदाच्या उमेदवार असलेल्या सौ. स्वाती सचिन दुधाळ आणि श्री.विष्णू शामराव वाघमारे तसेच प्रभाग क्रमांक १८ मधून उमेदवार असलेले शेख अब्दुल मुखीद अब्दुल रज्जाक (मुखीद लाला) आणि शेख फरहीन अर्शान (शेख रोहिल रफिक) यांच्या प्रचारार्थ

◆ पान १ वरून पुढे...

आयोजित केलेल्या कॉर्नर बैठकांनी प्रचार कार्यक्रमाला सुरूवात झाली. आयोजन केवळ कॉर्नर बैठकांचे असताना या बैठकांनी सभेचे स्वरूप धारण केले होते. दरम्यान यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांच्यासह माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, बीड नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. स्मितताई विष्णू वाघमारे यांची प्रमुख उपस्थित होती.

## महिलांनी शेवटी लढा ...

उत्पादन शुल्क ऑफिस कडे वारंवार संपर्क करून पाठपुरावा केला गावकऱ्यांनी, महिलांनी केलेल्या आंदोलनामुळे नियमानुसार निवडणूक घेण्यात आली. निवडणुकीच्या निकालात दारू दुकानास विरोध असणाऱ्या मतांची संख्या आडवी बाटली ५०० समर्थनार्थ मतांची संख्या. व उभी बाटलीसाठी ५० मतं पडली या निवडणुकीवर न्यायालयात परवानाधारकांकडून स्थगिती देण्यात आली. याप्रकरणी न्यायालयाकडूनही तातडीने सुनावणी घेण्यात आली. व सदर प्रकरणी न्यायालयाकडून गावकरी महिलांच्या बाजूने निकाल देण्यात आला. त्यात परवानाधारकांनी स्थगिती उठवण्यात सुप्रीम कोर्टात धाव घेतली असले तरी न्यायालयाने हे प्रकरण दाखल करून न घेता खालच्या न्यायालयाने दिलेला निकाल कायम ठेवला. न्यायालयाचे निर्णय मतमोजणी असलेली स्थगिती उठल्यामुळे या दारू दुकानात विरोध असणाऱ्या आडवी बाटलीला पाचशे मतं मिळाली त्यामुळे गावकरी महिलांचा यात विजय झाल्याने दारू दुकान परवाना कायमचा रद्द करून पूजा बियर बारला सील ठोकण्यात आले. त्यामुळे धानोरा गावातील बेवड्यांची संख्या कमी होईल. व सर्वसामान्य महिला नागरिकांना त्याचा त्रास आता होणार नाही, कारण शाळा जवळच असल्याने विद्यार्थी व गावातील नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत होता २४ तास दुकान उघडा असल्यामुळे गावात पंधरा वर्षांपासूनच मुले व नागरिक बेवड्यांची संख्या वाढली होती . त्याचा नाहक त्रास महिला वर्गाला सहन करावा लागत होता. त्यामुळे सौ. मोनिका बालासाहेब इंगोले सरपंच यांनी पुढाकार घेऊन कायमची उभी बाटली आडवी केली. त्यामुळे गावातील नागरिकांमध्ये महिलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## अंबाजोगाईत आतापर्यंत....

पडतात याबाबत नागरिकत उत्सुकता आहे.

सुमारे नऊ वर्षांनंतर होणाऱ्या या निवडणुकीत तिहेरी चुरस निर्माण झाली आहे. नगराध्यक्षपदासाठी राजकिशोर मोदी विरुद्ध नंदकिशोर मुंदडा अशी मुख्य लढत होत असून काँग्रेसचे असिफोद्दीन खतीब आणि मूळ भाजपच्या असलेल्या शोभा लोमटे (अपक्ष) या देखील निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. मोदी यांची लोकविकास आघाडी आणि मुंदडा यांची जनविकास आघाडीचे प्रत्येकी ३१ उमेदवार नगरसेवक पदासाठी निवडणूक लढवत असून काँग्रेसचे २० उमेदवार नगरसेवक पदासाठी निवडणुकीत उतरले आहेत. त्यामुळे तीन गटांमध्ये संघर्ष तीव्र होत असून राजकीय वातावरण तापू लागले आहे. उमेदवारांच्या प्रचारयात्रानी अंबाजोगाईचे वातावरण निवडणूकमय झाले आहे. गल्लोगल्ली, कार्यालयात सर्वत्र

◆ पान १ वरून पुढे...

निवडणुकीचीच चर्चा सुरु आहे. नेत्यांच्या कॉर्नर बैठका, गुप्त बैठकांना जोरात सुरु असून प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या कार्यकर्त्यांना आपल्याकडे खेचण्यासाठी सर्वच गट कामाला लागले आहेत. एकंदरीत सध्याची परिस्थिती पाहता मतदानाच्या दिवस जवळ येईल तसे तसे शहरातील वातावरण संवेदनशील होण्याची चिन्हे आहेत.

गुरुवारी (दि.२०) अर्ज मागे घेतलेल्या उमेदवारांची अधिकृत यादी– मोदी सुनीता राजकिशोर – प्रभाग १ योगेश्वरी
शेख जाहेदा बेगम रफिक प्रभाग १ योगेश्वरी
हेडे कमलाकर महादेवराव प्रभाग २ रविवार पेठ
मणियार अबु असिम म. फारोख– प्रभाग २ रविवार पेठ
काळे स्नेहा सुदर्शन – प्रभाग २ रविवार पेठ
हेडे शिला कमलाकर – प्रभाग २ रविवार पेठ
लोमटे अश्विनी किशोर प्रभाग ५ परळी वेस
कराड जीवनराव नामदेवराव प्रभाग ६ आदर्श कॉलनी
वाघाळकर सुषमा सुनिल प्रभाग ६ आदर्श कॉलनी
गोस्वामी कल्पना श्रीकांत प्रभाग ६ आदर्श कॉलनी
मोदी शुभांगी अलोक – प्रभाग १० गुरुवार पेठ
सय्यद हुजैफा फारान ताहीर प्रभाग १० गुरुवार पेठ
सरवदे ज्योती धम्मपाल– प्रभाग ११ गवळीपुरा
सरवदे सोनाली गुरु– प्रभाग ११ गवळीपुरा
गवळी जावेद इस्माईल – प्रभाग ११ गवळीपुरा
शेख नुजहत तरन्नुम – प्रभाग १२ सदर बाजार
जगदाळे प्रियंका महादेव प्रभाग १३ एसआरटी दवाखाना
पठाण सैफ खान अमजद खान – प्रभाग १४ लाल नगर
मोदी संकेत राजकिशोर नगराध्यक्ष पद

## भाजीपाला घेत असताना...

व्यवहारातून हा वाद झाल्याने हत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, नेमकं हत्या करण्याचं कारण समोर आलेलं नाही. पोलीस या प्रकरणाची कसून चौकशी करत आहेत. दरम्यान, अचानक चारचाकी गाडीतून तीन जणांना येऊन बाबासाहेब सोमधाने यांच्यावर तलवारीने हल्ला केल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. दरम्यान, या घटनेमुळं जालना शहरात खळबळ उडाली आहे.

## पोलिसांची छापेमारी...

अनेक मटका बुकी एजंटवर कारवाई करीत मटका किंग गणेश खराडे, चांद शेख व अनेक एजंटवर गुन्हे दाखल करण्यात आले. त्यानंतर केज ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी ही धाडी मारल्या होत्या. त्यातून ही जनावरांच्या सरकारी दवाखाना परिसरात चालता फिरता गैबोद्दीन अहेमद शेख (रा. कोकीजपीर मोहल्ला, केज) हा एजंट गणेश खराडेच्या सांगण्यावरून १० टक्के कमिशनवर मटका जुगार घेत होता. ही माहिती मिळताच फौजदार अमिरोद्दीन इनामदार, पोलीस नाईक संतोष गित्ते यांनी

◆ पान १ वरून पुढे...

१९ नोव्हेंबर रोजी रात्री ७.५५ वाजेच्या सुमारास छापा मारून गैबोद्दीन शेख यास पकडले. त्याच्याकडील मटका जुगाराचे साहित्य, नगदी तीन हजार ३० रुपये व चार हजाराचा मोबाईल जप्त केला. फौजदार अमिरोद्दीन इनामदार यांच्या फिर्यादीवरून गणेश खराडे, गैबोद्दीन शेख विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## वाळू माफियांना...

उपशावर अशाच कठोर कारवाया सुरू राहतील असा इशारा दिला आहे. अनेक भागात बेकायदा वाळू उपसा रोखण्याची मागणी– एका बाजूला प्रशासन नगरपालिका निवडणुका गुंतलेले असताना याचाच फायदा वाळू माफिया घेत असल्याने भीमा नदी पात्रात बेकायदा वाळू उपसा सुरू होता. गुरसाळे आणि शेळवे वर कारवाई झाल्यानंतर आता गोपाळपूर, शेगाव दुमाला, शिरढोण, चळे , आंबे अशा विविध गावातही बेकायदा वाळू उपसा रोखण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

**जाहीर प्रगटन**

**मा.दिवाणी न्यायाधीश (व .स्तर)**
**बीड यांचे न्यायलयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रं. १६१० /२०२५**

**अर्जदार– १) बाबुराव पि.बाजीराव वरपे, वय–७६ वर्षे, धंदा–शेती, रा. कुटेवाडी ता. जि. बीड, २) तुकाराम पि.बाबुराव वरपे, वय – ५१ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर**
**(अर्जदार हे भारतीय रहिवाशी आहेत)**
**विरुध्द निरंक**
**दावा महोदय, – कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे.**
**महोदय,**
**याकामी अर्जदारांची विनंती खालील प्रमाणे आहे.**
**१. हे की, अर्जदार क्रं. १ हे मयताचे पती आहेत. तसेच अर्जदार क्रं. २ हा मयताचा मुलगा आहे.मयत नामे मुक्ताबाई भ्र.बाबुराव वरपे, रा. कुटेवाडी ता.जि.बीड या दिनांक १५–०७–२०२४ रोजी कुटेवाडी ता.जि.बीड येथे मयत झालेल्या आहेत.**
**२) हे की, अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. मयतास सदर अर्जदार वगळता इतर कोणीही वारस नाहीत.**
**३) हे की, मयता बद्दल व इतर आवश्यक माहिती खालील प्रमाणे.**
**अ) मयताचे संपुर्ण नांव, मृत्यु दिनांक व ठिकाण– मुक्ताबाई भ्र.बाबुराव वरपे, मृत्यु दिनांक १५–०७–२०२४ ठिकाण:–कुटेवाडी ता.जि. बीड**
**ब) मयताचे कायमस्वरुपीचे वास्तव्याचे ठिकाण :– कुटेवाडी ता.जि.बीड**
**क) मयताचे नातेवाईक व त्यांचे रहिवाशी ठिकाण व मयताशी नाते संबंध–**
**आग्रलेखात लिहल्या प्रमाणे. अर्जदारांशिवाय मयताचे इतर कोणीही नातेवाईक नाहीत.**
**पुढील तारीख ०६/०१/२०२५**
**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**
**(स्वाक्षरीत) क.लिपीक**
**शिक्का**

**जाहीर प्रगटन**

**तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४९७/२०२५**
**आण्णा तुळशीराम बरडे –विरुध्द– ग्रा.पं. कार्या. खंडाळा**
**पहा,**
**१. आण्णा तुळशीराम बरडे, रा. खंडाळा ता. जि. बीड**
**उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक भाग्यश्री आण्णा बरडे यांचा दिनांक १७/०९/२०१९ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.**
**सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास खंडाळा ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे खंडाळा ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.**
**आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.**
**सदर प्रकरणात पुढील तारीख ०७/१२/२०२५ ही आहे.**
**(स्वाक्षरीत) तालुका दंडाधिकारी, बीड**
**शिक्का**

◆ पान ४ वरून पुढे...

## शेतकऱ्यांच्या बिबट्यापासून....

दिवसभरात किमान ८ ते १० तास सातत्याने वीजपुरवठा देण्यात यावा, अशी आमदार धस यांनी निवेदनाद्वारे मागणी केली. दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाल्यास शेतकरी सुरक्षितपणे कार्यरत राहू शकतील तसेच ऊसतोडणी मजुरांना देखील भयमुक्त वातावरणात काम करणे शक्य होईल, असे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले.शेतकऱ्यांच्या सुरक्षेला आणि हंगामी पिकांच्या तातडीच्या गरजेला प्राधान्य देऊन महावितरणने या मागणीची त्वरित दखल घ्यावी असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.

## धारूर पालिका...

या निवडणुकीत ज्या पक्षाचा उमेदवार कुंडलिका पाणीपुरवठ्याबाबत ठोस आणि कालबद्ध हमी देईल, त्याच्याकडे मतदारांचा कल झुकू शकतो, निवडणुकीत पाण्याबरोबरच अन्य प्रश्नही गाजणार आहेत बंद पडलेले कचरा विलगीकरण केंद्र, शहर हद्दवाढ, कासार तलावाचे अपूर्ण सुशोभीकरण, बाजारतळाचा विकास, उच्चदाबाने होणारा विद्युत पुरवठा, बस स्थानकाची दुरवस्था आणि धारूर किल्ल्याच्या संवर्धनाचे प्रलंबित काम. हे विषयही मतदारांच्या मनात तितकेच महत्वाचे असले तरी, घराघरातली सर्वात तीव्र गरज 'पाणी' असल्याने मुख्य लढत याच मुद्द्यावर केंद्रित राहील, हे निर्विवाद आहे.

## चौसाळा जिल्हा....

उलट ते अधिक जोमाने लोकसेवेसाठी पुढे सरसावले. मतदार संघातील राजकीय परिस्थितीनुसार त्यांनी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी

◆ पान ४ वरून पुढे...

काँग्रेस (शरद पवार) गटात आमदार संदीप भैय्या क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश केला असून ते आमदार संदीप भैय्या क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद गटातील शेतकऱ्यांसाठी विजेचा प्रश्न, पिक विमा व कृषी विभागाशी संबंधित अडचणी यासह इतर कामासाठी कायम पाठपुरावा करतात, तसेच सर्कल मधील नागरिकांसाठी दवाखान्यासह इतर अडचणीच्या काळात कायम लोकांच्या मदतीला येतात. अशा विविध विषयांवर विजयराजे शिंदे कायम सक्रिय असतात. त्यांच्या या लोकाभिमुख कामांची जनतेत मोठी दखल घेतली जात असून, त्यामुळेच येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत त्यांना संधी द्यावी, अशी जनतेतून मागणी वाढत चालली आहे. जिल्हा परिषद गटातील नागरिक व कार्यकर्त्यांचा असा विश्वास आहे की, विजयराजे शिंदे हेच चौसाळा गटाच्या विकासाचे योग्य तरुण प्रतिनिधी ठरू शकतात. त्यामुळे त्यांनी चौसाळा जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवावी अशी मागणी सर्कलमधील नागरिकांसह कार्यकर्त्यांमधून करण्यात येत आहे.

## पश्चिम महाराष्ट्रात....

आहे. ऊस वजणदार भरतो, सरळ वाढ होत असल्याने तोड सोपी होते.. एकरी उत्पादन अन्य जातीच्या तुलनेत जास्त होते.. खोडकिड, शेंडेकिड, लोकरीमावा, कांडीकिड या रोगांचा प्रादुर्भाव या वाणावर तुलनेत कमी होतो.. कमी पाण्यात जास्त उत्पादन होत असल्यानं मराठवाड्यातील शेतकरी या वाणासाठी जास्त आग्रही असतात..महत्वाचे म्हणजे या जातीच्या ऊसाला डुकरांचा उपद्रव नसतो.. मात्र कारखानदार गैरसमजातून नोंदी घेत नाहीत आणि ऊस गाळपासाठी घेण्यासाठी देखील तयार नसतात असे देशमुख यांनी स्पष्ट केले आहे.. नांदेडच्या प्रादेशिक

◆ पान ४ वरून पुढे...

सहसंचालकांनी नुकतेच एक परिपत्रक काढून २६५ जातीच्या नोंदी घेण्याच्या सूचना नांदेड, परभणी, लातूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांना दिल्या आहेत.. नोंदी घेतल्या नाही तर तक्रारी करण्याच्या सूचना देखील दिलेल्या आहेत, मात्र अशा तक्रारी देऊन साखर कारखान्याशी पंगा घ्यायला कोणताही शेतकरी तयार नसतो.. त्यामुळं साखर आयुक्तांनीच २६५ जातीच्या वाणाची किती नोंद झाली याची माहिती प्रत्येक कारखानयाकडून घेऊन त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली तरच हा तिढा सुटेल असे एस.एम.देशमुख यांनी स्पष्ट केले आहे.. २६५ जातीचा ऊस शेतकरयांसाठी किफायतशीर आहे, अन शेतकरयांनी आपल्या शेतात कुठला ऊस लावला पाहिजे हे त्याला ठरवू द्या, कारखाने शेतकरयांना खड्ड्यात घालून स्वता:च्या लाभ – तोट्याचा विचार करणार असतील तर ते सर्वथा गैर आहे.. साखर आयुक्तांनी यावर तातडीने निर्णय घ्यावा कारण आता ऊस लागवड आणि तोडीचा हंगाम जोरात सुरू आहे असेही देशमुख यांनी पत्रात नमूद केले आहे..

## मराठवाडा शिक्षक...

काढण्या बाबत तातडीने कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला. सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या प्रलंबित फरकाचे हप्त्यां बाबत उचित कार्यवाही करणे, प्रलंबित वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके तातडीने जमा करण्याचे आदेश निर्गमित करण्या बाबत निर्णय घेण्यात आले. निवड श्रेणी, वरिष्ठ श्रेणी, वैद्यकीय प्रतिपूर्त्ती देयकाका बाबतची अनेक वैयक्तिक प्रकरणे बैठकीतच निकाली काढण्यात आली. याप्रसंगी संघटनेच्या वतीने शिक्षण; प्रश्न अनेक–ऊत्तर एक ज्ञानोबा वरवट्टे गौरव ग्रंथ मान्यवरांना भेट देण्यात आला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४९९/२०२५

विष्णू पि. प्रभाकर तांदळे –विरुध्द– ग्रा.पं. कार्या. हिंगणी(खुर्द)

पहा,

१. विष्णू पि. प्रभाकर तांदळे, रा. हिंगणी(खुर्द) ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक वेदांत विष्णू तांदळे यांचा दिनांक १६/०२/२०१४ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास हिंगणी(खुर्द) ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे हिंगणी(खुर्द) ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०७/१२/२०२५ ही आहे.

(स्वाक्षरीत)

शिक्का

तालुका दंडाधिकारी, बीड

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ५०२/२०२५

मझहर बाबु शेख –विरुध्द– ग्रा.पं. कार्या. कामखेडा

पहा,

१. मझहर बाबु शेख , रा.कामखेडा ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक फातीमा मझहर शेख यांचा दिनांक ०२/११/२०२१ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास कामखेडा ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कामखेडा ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ११/१२/२०२५ ही आहे.

(स्वाक्षरीत)

शिक्का

तालुका दंडाधिकारी, बीड

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४७६/२०२५

विष्णू तुळशीराम बरडे –विरुध्द– ग्रा.पं. कार्या. खंडाळा

पहा,

१. विष्णू तुळशीराम बरडे , रा. खंडाळा ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक वेदिका विष्णू बरडे यांचा दिनांक २७/०३/२०१९ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास खंडाळा ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे खंडाळा ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०१/१२/२०२५ ही आहे.

(स्वाक्षरीत)

शिक्का

तालुका दंडाधिकारी, बीड

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४७४/२०२५

मच्छिंद्र नवनाथ पवार –विरुध्द– ग्रा.पं. कार्या. खंडाळा

पहा,

१. मच्छिंद्र नवनाथ पवार , रा. खंडाळा ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक ओमकार मच्छिंद्र पवार यांचा दिनांक ०५/०६/२०१९ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास खंडाळा ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे खंडाळा ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०१/१२/२०२५ ही आहे.

(स्वाक्षरीत)

शिक्का

तालुका दंडाधिकारी, बीड

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ५०१/२०२५

संजय गंगाराम जाधव –विरुध्द– ग्रा.पं. कार्या. वाढवणा

पहा,

१. संजय गंगाराम जाधव, रा. वाढवणा ता. जि. बीड (ह.मु. थेरगाव, पुणे)

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक संजय गंगाराम जाधव यांचा दिनांक १०/०२/१९७० रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास वाढवणा ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे वाढवणा ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २७/१२/२०२५ ही आहे.

(स्वाक्षरीत)

शिक्का

तालुका दंडाधिकारी, बीड

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ५००/२०२५

रंगनाथ गंगाराम जाधव –विरुध्द– ग्रा.पं. कार्या. वाढवणा

पहा,

१. रंगनाथ गंगाराम जाधव, रा. वाढवणा ता. जि. बीड (ह.मु. चिंचवड, पुणे)

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक रंगनाथ गंगाराम जाधव यांचा दिनांक १६/०४/१९६१ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास वाढवणा ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे वाढवणा ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २७/१२/२०२५ ही आहे.

(स्वाक्षरीत)

शिक्का

तालुका दंडाधिकारी, बीड

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४७७/२०२५

बाळासाहेब मोहन पवार –विरुध्द– ग्रा.पं. कार्या. खंडाळा

पहा,

१. बाळासाहेब मोहन पवार, रा. खंडाळा ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक आर्वी विठ्ठल पवार यांचा दिनांक १५/०८/२०१९ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास खंडाळा ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे खंडाळा ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०१/१२/२०२५ ही आहे.

(स्वाक्षरीत)

शिक्का

तालुका दंडाधिकारी, बीड

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४७४/२०२५

महेंद्र मारोती बांगर –विरुध्द– ग्रा.पं. कार्या. खंडाळा

पहा,

१. महेंद्र मारोती बांगर , रा. खंडाळा ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक नंदिनी महेंद्र बांगर यांचा दिनांक १०/०४/२०१६ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास खंडाळा ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे खंडाळा ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०१/१२/२०२५ ही आहे.

(स्वाक्षरीत)

शिक्का

तालुका दंडाधिकारी, बीड

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४९५/२०२५

रामकृष्णा सोनाजी गायकवाड –विरुध्द– ग्रा.पं. कार्या. वरवटी/आहेरधानोरा

पहा, १. रामकृष्णा सोनाजी गायकवाड, रा. आहेरधानोरा ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक यश महादेव गायकवाड यांचा दिनांक १४/१२/२००९ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास वरवटी/आहेरधानोरा ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे वरवटी/आहेरधानोरा ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०७/१२/२०२५ ही आहे.

(स्वाक्षरीत)

शिक्का

तालुका दंडाधिकारी, बीड

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४९६/२०२५

बाळासाहेब मोहन पवार –विरुध्द– ग्रा.पं. कार्या. खंडाळा

पहा,

१. बाळासाहेब मोहन पवार, रा. खंडाळा ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक शिवकन्या संजय माळी यांचा दिनांक १०/०९/२०१८ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास खंडाळा ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे खंडाळा ता. जि. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०७/१२/२०२५ ही आहे.

(स्वाक्षरीत)

शिक्का

तालुका दंडाधिकारी, बीड

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४९८/२०२५

सभाकर मधुकर मेंगडे –विरुध्द– ग्रा.पं. कार्या. चऱ्हाटा

पहा,

१.सभाकर मधुकर मेंगडे, रा. मेंगडेवाडी ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक सभाकर मधुकर मेंगडे यांचा दिनांक १५/०४/१९९० रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास चऱ्हाटा ता. बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहून मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे चऱ्हाटा ता.जि.बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०७/१२/२०२५ ही आहे.

(स्वाक्षरीत)

शिक्का

तालुका दंडाधिकारी, बीड

## जाहीर प्रगटन

### मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड

किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १४९७ / २०२५

CNR No. MHBI020000031812025

सुरेखा सुरेश मोरे व इतर २ वि. निरंक

अर्जदार १. सुरेखा भ्र. सुरेश मोरे, वय–५२ वर्षे, धंदा–घरकाम, रा. रौळसगाव ता. जि. बीड, २. हर्षल पि. सुरेश मोरे, वय–२४ वर्षे, धंदा–शेती, रा. रौळसगाव ता. जि. बीड, ३. प्रियंका भ्र. चैतन्य हजारे, वय–२७ वर्षे, धंदा–घरकाम, रा. रौळसगाव ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ ते ३ यांनी या न्यायालयात मयत सुरेश हरिभाऊ मोरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत सुरेश हरिभाऊ मोरे यांचा दिनांक ०४/०४/२०२२ रोजी मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार का. २ हा मयताचा मुलगा आहे व अर्जदार क. ३ ही मयताची विवाहित मुलगी आहे. तसेच मयताची आई–वडील यापुर्वीच मयत झाले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत सुरेश हरिभाऊ मोरे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०६/१२/२०२५

आज दिनांक ०५ माहे नोव्हेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

(मार्फत – ॲड. डी. एम. रोटे)

आदेशावरून

(स्वाक्षरीत)

अधिक्षक

दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

(स्वाक्षरीत)

क.लिपीक

शिक्का

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

### गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ८०९/२०२५

काशिबाई उमाजी कणसे विरुद्ध– निरंक

ज्याअर्थी मयत नामे शांताबाई लिंबाजी कदम हे दिनांक २१.०६.२०२५ रोजी दिमाखवाडी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार– १. काशिबाई उमाजी कणसे, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम, रा. दिमाखवाडी ता. गेवराई जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व गैरअर्जदार यांना सदर मयत नामे शांताबाई लिंबाजी कदम, रा. दिमाखवाडी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : ०३.१२.२०२५

(मार्फत ॲड. डी.एम. रोटे )

आदेशावरून

(स्वाक्षरीत)

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय व.स्तर गेवराई

(स्वाक्षरीत)

क.लिपीक

शिक्का

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

### गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७८९/२०२५

काशिबाई उमाजी कणसे वि. निरंक

ज्याअर्थी मयत लिंबाजी पि. केशव कदम, रा. दिमाखवाडी ता. गेवराई जि. बीड हे / हया दिनांक २२/०२/२०२० रोजी मौजे दिमाखवाडी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार काशिबाई भ्र. उमाजी कणसे, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम रा. दिमाखवाडी ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार व गैरअर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत लिंबाजी पि. केशव कदम, रा. दिमाखवाडी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २२/०९/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :– १०/१२/२०२५

(मार्फत ॲड. डी. एम. रोटे, गेवराई)

आदेशावरून

(स्वाक्षरीत)

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय व.स्तर गेवराई

(स्वाक्षरीत)

क.लिपीक

शिक्का

## जाहीर प्रगटन

### मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १७३८/२०२५

सोजरबाई प्र. कचरु सातपुते वि. निरंक

मागणी :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः १. सोजरबाई भ्र. कचरु सातपुते, वय ७३ वर्षे, धंदा घरकाम, रा. नवगण राजुरी ता. जि. बीड २. बंडु पि. कचरु सातपुते, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. नवगण राजुरी ता. जि. बीड, ३. रामहरी पि. कचरु सातपुते, वयः ४४ वर्षे, धंदा शेती, रा. नवगण राजुरी ता.जि. बीड , ४. संजय पि. कचरु सातपुते, वयः ४० वर्षे, धंदा शेती, रा. नवगण राजुरी ता. जि. बीड

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे कचरु पि. हरिभाउ सातपुते, राहणार – नवगण राजुरी ता. जि. बीड हे दिनांक ११/१०/२०२५ रोजी नवगण राजुरी ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे कचरु पि. हरिभाउ सातपुते यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत कचरु पि. हरिभाउ सातपुते, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख २४/१२/२०२५ आहे.

आज दिनांक २०/११ / २०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

(मार्फत ॲड. महाजन)

आदेशावरून

(स्वाक्षरीत)

अधिक्षक

दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

(स्वाक्षरीत)

क.लिपीक

शिक्का

## जाहीर प्रगटन

### मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज १६०९/२०२५

पठाण नरेखा विरूध्द निरंक

अर्जदार – १. पठाण बनेखा बाबामिया, वय – ६५ वर्षे, धंदा– व्यापार, रा. कुर्ला ता.जि. बीड, ह.मु. मसरत नगर, जिजामाता चौक, बीड ता. जि. बीड, २. गणीखां पि. बाबामिया पठाण, वय ६४ वर्षे, धंदा– शेती, रा. कुर्ला ता.जि. बीड, ३. मजिद बाबामिया पठाण, वय ५६ वर्षे, धंदा – शेती रा. सदर, ४. पठाण अय्युब बाबामिया, वय ५२ वर्षे, धंदा – शेती रा. सदर , ५. सय्यद महेताबबी सय्यद अमीन, वय ७८ वर्षे, धंदा – घरकाम, रा. कामखेडा ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत रशिदाबी भ्र. बाबामिया पठाण यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत रशिदाबी भ्र. बाबामिया पठाण यांचा मृत्यु दिनांक २४/०४/२०२० रोजी झाला आहे. वरील अर्जदार क्र. १ ते ५ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत रशिदाबी भ्र. बाबामिया पठाण यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार क्र. १ ते ५ यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत रशिदाबी भ्र. बाबामिया पठाण यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/११/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९/११/२०२५ आहे

आदेशावरून

(स्वाक्षरीत)

अधिक्षक

दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

(स्वाक्षरीत)

क.लिपीक

शिक्का

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०२५ ● पान ४

# शेतकऱ्यांच्या बिबट्यापासून सुरक्षेसाठी दिवसा वीजपुरवठ्याची मागणी

## आमदार सुरेश धस यांचे महावितरणला निवेदन





**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी-पाटोदा-शिरूर (कासार) तालुक्यातील शेतकऱ्यांना सुरक्षिततेची भीषण परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, बीड येथील कार्यकारी अभियंत्यांना औपचारिक निवेदन सादर करून दिवसा वीजपुरवठा देण्याची तातडीची मागणी केली आहे. मागील काही दिवसांपासून या तीनही तालुक्यातील अनेक गावांमध्ये बिबट्याचे वारंवार दर्शन होत असून नागरिकांसह शेतकरी भयभीत आहेत. विशेषतः रात्री आणि पहाटेच्या वेळी बिबट्याची हालचाल वाढत असल्याने रब्बी पिकांना पाणी देणे, कांद्याची लागवड, तसेच ऊसतोडणीसारखी कामे मोठ्या अडचणीत आली आहेत. ऊसतोडणी मजूरदेखील रात्रीच्या वेळी काम करण्यास स्पष्ट नकार देत आहेत.सध्या महावितरणकडून शेतीपंपांना रात्री १२ ते पहाटे ६ या वेळेत वीजपुरवठा केला जातो. मात्र, या काळात बिबट्याचा धोका अत्यंत जास्त असल्याने शेतकरी शेतात जाणे टाळत आहेत. शेतीची सर्व कामे ठप्प झाले असून ही परिस्थिती लक्षात घेता शेतीपंपांसाठी ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● बिबट्याचा मुक्त वावर...

**आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी,घाटा-पिंपरी, धामणगाव रोडवरील घाटा पिंपरी जवळील घाट परिसरात वनविभागाच्या परिक्षेत्रात बुधवार दि.१९ नोव्हेंबर रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास बिबट्याचे दर्शन झाल्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावरून दर्शन करून परत येत असताना आष्टी सद्गुरु ग्रुपच्या युवकांना बिबट्या नगर-बीड महामार्ग ओलांडताना दिसला.या भागात वन्यप्राण्यांची वर्दळ वाढल्याने या महामार्गावरून जाणाऱ्या प्रवाशांनी सतर्कता बाळगावी विशेषता दुचाकी वरील प्रवाशांनी सावधगिरीने या मार्गावरून प्रवास करावा परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.**

# धारूर पालिका निवडणूक प्रचारात पाणी प्रश्न ठरणार निर्णायक मुद्दा

## पंधरा दिवसांनी नळाला पाणी येणे हा प्रकार कायम

**बीड । प्रतिनिधी**

धारूर नगर परिषद निवडणूकीचा प्रचार आता सुरु झाला आहे. शहराचा अनेक वर्षांपासून रखडलेला पाणी पुरवठ्याचा प्रश्न यंदाच्या नगर पालिका निवडणूकीत प्रचाचाराचा प्रमुख मुद्दा ठरणार आहे. धारूर शहराला सध्या धनेगाव पाणीपुरवठा योजनेतून पाणी मिळते. परंतु काही भागात दहा दिवसांनी, तर काही भागात पंधरा दिवसांनी नळाला पाणी येणे हा प्रकार कायम आहे.



प्रशासन असो किंवा निवडून आलेली सत्ता पाण्याचा तुटवडा शमवण्यात कोणालाही यश आले नाही, ही कटू वस्तुस्थिती आहे. त्यामुळे नागरिकांना हातपंप, स्थानिक विहिरी व खाजगी टैंकर्सवर अवलंबून राहावे लागते. दरम्यान, शहरासाठी पूर्वी मंजूर झालेली १९ कोटींची योजना पूर्ण होऊ शकली नाही. त्यानंतर नगरोत्थानअभियानांतर् गत ६५ कोटी रुपयांची नवी योजना मंजूर झाली असून गेल्या वर्षभरापासून या कामांना गती मिळाली आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

# चौसाळा जिल्हा परिषद गटातून विजयराजे शिंदे यांनी निवडणूक लढवावी : जनतेची वाढती मागणी



**बीड । प्रतिनिधी**

चौसाळा जिल्हा परिषद गटात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विजयराजे शिंदे यांच्या उमेदवारीची जोरदार मागणी जनतेतून होत आहे. चौसाळा शहरासह जिल्हा परिषद गटातून विजयराजे शिंदे यांचे नाव सर्कल मधील जनतेतून सर्वात पुढे येत आहे. त्यांनी गेल्या काही वर्षांत केलेल्या सातत्यपूर्ण सामाजिक कार्यामुळे आणि लोकांमध्ये निर्माण झालेल्या विश्वासामुळे ते या गटासाठी सर्वाधिक योग्य उमेदवार तरुण चेहरा म्हणून पुढे येत आहेत अशी जनतेत चर्चा सुरू आहे.

डिसेंबर २०२२ मध्ये झालेल्या चौसाळा ग्रामपंचायत निवडणुकीत त्यांनी युवा क्रांती पॅनलच्या माध्यमातून सरपंच पदाची निवडणूक लढवत जोरदार लढत देत १३०० हून अधिक मते मिळवली होती. त्या वेळी चौसाळा शहरात तिरंगी सामना रंगला असला, तरी पराभवानंतरही विजयराजे शिंदे जनतेपासून दूर गेले नाहीत. ▶▶ उर्वरित पान २ वर

# पश्चिम महाराष्ट्रात चालतो, मग मराठवाड्यातील साखर कारखानदारांना २६५ जातीच्या ऊसाचे वावडे का ?



### ● एस.एम.देशमुख यांचा सवाल

**बीड । प्रतिनिधी**

साखर आयुक्तांचा आदेश आणि सक्त ताकीद असताना देखील मराठवाड्यातील अनेक साखर कारखाने फुले २६५ जातीच्या ऊसाची नोंद घेत नाहीत किंवा तो ऊस घ्यायलाही टाळाटाळ करतात, साखर सम्राटांना २६५ जातीच्या ऊसाचे वावडे का आहे ? असा सवाल ज्येष्ठ पत्रकार एस.एम.देशमुख यांनी केला आहे.. एस.एम.देशमुख यांनी साखर आयुक्तांना एक पत्र पाठवून साखर कारखान्यांच्या अरेरावी कडे आणि त्यांच्या आदेशाला कशी केराची टोपली दाखवली जातेय या वास्तवाकडे साखर आयुक्तांचे लक्ष वेधले आहे..साखर कारखाने २६५ जातीचा ऊस का घेत नाहीत ?या क्षेत्रातील काही जाणकारांशी चर्चा केली असता साखरेचा उतारा कमी येतो असा अनेक कारखानदारांचा गैर समज असल्याचं सांगणयात आलं.. मात्र डिसेंबर-जानेवारीत म्हणजे योग्य वेळी ऊस तोड झाली तर उतारा १४.४० टक्या पर्यत येतो असंही हे जाणकार सांगतात.. म्हणजे कारखानदार चुकीचा अर्थ काढून शेतकरयांची अडवणूक करीत आहेत असा आरोप एस.एम. देशमुख यांनी केला आहे.. २००७ मध्ये वसंतदादा शूगर इन्स्टिटयूट आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांनी फुले २६५ हा ऊसाचा वाण विकसित केला.. तेव्हाच या जातीची सर्व हंगामासाठी शिफारस केली गेली होती.. २००९ मध्ये अखिल भारतीय ऊस संशोधन संस्था लखनऊ (आयआयएसआर) यांनीही गुजरात, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, तामिळनाडू या राज्यांसाठी २६५ या वाणाची शिफारस केलेली आहे.. महाराष्ट्रात ३२ टक्के क्षेत्रावर ही जात लावली जाते.. पश्चिम महाराष्ट्रात काही अडचण नाही पण मराठवाड्यातील कारखानदार शेतकरयांची अडवणूक करताना दिसतात..ही वस्तुस्थिती देशमुख यांनी पत्रात विषद केली आहे..

शेतकरयांसाठी हा ऊस फायद्याचा ▶ उर्वरित पान २ वर

# मराठवाडा शिक्षक संघाची बीड शिक्षणाधिकारी माध्यमिक समवेत तक्रार निवारण बैठक संपन्न

## बैठकीच अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांची शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बीड मा प्रियाराणी पाटील यांच्या समवेत तक्रार निवारण बैठक अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. अनेक प्रलंबित प्रश्न बैठकीतच सोडविण्यात आले तर काही प्रश्न ठराविक कालमर्यादेत सोडविण्याचा निर्णय घेण्यात आला.

या बाबत अधिक माहिती अशी की, शिक्षणाधिकारी माध्यमिक स्तरावरील आणि शालेय स्तरावरील प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मराठवाडा शिक्षक संघाने मा शिक्षणाधिकारी माध्यमिक समवेत तक्रार निवारण बैठक आयोजित करण्याची विनंती केली होती. त्यानुसार



बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी. एस. घाडगे, अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, मार्गदर्शक डी.जी. तांदळे, जिल्हाध्यक्ष कालिदास धपाटे, जिल्हा सचिव गणेश आजबे, केंद्र कार्यकारिणी सदस्य अशोक मसकले, बंडू आघाव, विनोद सवासे यांनी संघटनेच्या वतीने भागिदारी केली तर मा प्रियाराणी पाटील, अजय बहीर, अधीक्षक(माध्यमिक), राजेश खटावकर अधिक्षक वेतन व भनिनि पथक, नानाभाऊ हजारे उपशिक्षणाधिकारी माध्यमिक,जेष्ठ लिपिक श्री तावडे शिक्षणाधिकारी माध्यमिकच्य वतीने बैठकीत भागिदारी केली. बारा व चोवीस वर्षाच्या अर्हताकारी सेवे नंतर देय्य प्रलंबित वरिष्ठ व निवड प्रकरणे निकाली ▶▶ उर्वरित पान २ वर

# मालेगाव चिमुरडीवरील अत्याचार प्रकरणी लिंबागणेश येथे तीव्र निदर्शने; आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात ३ वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिला दगडाने ठेचून निर्घृणपणे हत्या केल्याच्या भीषण घटनने सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. या अमानुष कृत्याचा तीव्र निषेध करण्यासाठी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे गुरुवार, दि. २० रोजी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या



नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोरदार निदर्शने केली. निदर्शनाच्या सुरुवातीला स्व. यज्ञा दुसाने या चिमुरडीला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी आरोपींना फाशीच झाली पाहिजे, बलात्कार्यांना कायद्याची भीती निर्माण करा अशा घोषणा देत ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला.

निवेदनाद्वारे खालील प्रमुख मागण्या करण्यात आल्या : आरोपींवर कठोरात कठोर फाशीची शिक्षा व्हावी, खटला जलदगती विशेष न्यायालयात चालवावा, सर्व सहआरोपींवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, पीडित कुटुंबाला संरक्षण व आर्थिक मदत द्यावी, महिलांवरील वाढत्या अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर शासनाने कठोर भूमिका घ्यावी. हे निवेदन बीड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक यांच्यामार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आले. या निदर्शनात राजेभाऊ जाधव, बाळासाहेब, सरपंच बालासाहेब जाधव, पत्रकार हरिओम क्षीरसागर,उपसरपंच बाळकृष्ण थोरात,शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील मोरे, सर्पमित्र अशोक जाधव,विनायक वाणी, श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात,अँड.गणेश वाणी, शिवाजी वाणी,दादा वाणी,शहादेव कोल्हे, रामकिसन गिरे, रुपचंद गव्हाणे, चोखोबा निर्मळ, अशोक दाभाडे, नरहरी ढवळे, अंकुश जाधव, विनायक मोरे , रफीक सय्यद, अकबर सय्यद,शहादेव ढास आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## थोडक्यात...

### अपक्ष उमेदवार सुरेखा जगताप यांची माघार ; शिवसेनेच्या मनीषा गिराम यांना जाहीर पाठिंबा



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेच्या प्रभाग ८ (ब ) अपक्ष उमेदवार सुरेखा सुनील जगताप यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज आज मागे घेतला. या प्रभागाला सक्षम व उच्चशिक्षित असलेल्या शिवसेना उमेदवार सौ मनीषा उल्हास गिराम यांना त्यांनी जाहीर पाठिंबा देऊन शुभेच्छा दिल्या. शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या सौभाग्यवती सौ मनीषा गिराम प्रभाग क्रमांक ८ ब मधून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. गिराम यांच्या पत्नी उच्चशिक्षित असून शहराच्या विकासाची जाण असणारा चेहरा आहेत. गिराम यांची उमेदवारी बीड शहराच्या विकासात निर्णयाक असणार असून त्यांना पाठिंबा जाहीर करत असल्याचे अपक्ष उमेदवार सुनील जगताप यांनी सांगितले.

### घाटपिंप्री गावात जुन्या वादातून घरावर हल्ला, १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

जुन्या वादातून महिलेच्या घरावर हल्ला करून वाहनांची तोडफोड केली. त्यानंतर घरातील सामानाची नासधूस करून तब्बल ४ लाख ८५ हजार रुपयांचे नुकसान करण्यात आले. ही घटना आष्टी तालुक्यातील घाटपिंप्री येथे घडली. याप्रकरणी १४ जणांविरोधात अंभोरा ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. नंदाबाई भास्कर बायकर यांनी याबाबत तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीनुसार, जुन्या वादातून त्यांच्या घरावर हल्ला करण्यात आला. त्यांच्या घरासमोर असलेल्या वाहनांची तोडफोड करण्यात आली. घरातील सामानाची नासधूस करण्यात आली. यामध्ये ४ लाख ८५ हजार रुपयांचे नुकसान करण्यात आले. शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली गेली. दहशत निर्माण केली गेली. याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलिस अधिक तपास करत आहेत.

### साहेबराव योगाजी डोईफोडे यांचे दु:खद निधन



**ईट । प्रतिनिधी**

साहेबराव योगाजी डोईफोडे यांचे दि.२०. नोव्हेंबर २०२५ गुरुवारी रात्री. १:३० च्या सुमारास अल्प आजाराने दु:खद निधन झाले, ते ८२ वर्षाचे होते. साहेबराव योगाजी डोईफोडे हे शेतकरी पुत्र गोर-गरिबांचे कैवारी तसेच मनमिळावू व गमतीदार स्वभावाचे होते. त्यांच्या या स्वभावामुळे मित्र, नातेवाईकांमध्ये हळ हळ व्यक्त होत आहे. पूर्वीपासून आपले जिवन उल्हासात व आनंदात जगणारे साहेबराव योगाजी डोईफोडे हे साधे जिवनमान असल्याने. त्यांचा शब्द कधी खाली गेला नाही. काही दिवसापूर्वी त्यांना एका खाजगी रुग्णालय मध्ये दाखल केले होते. त्यांचे अल्पशाह आजाराने निधन झाले त्यांच्या अचानक निधनाने ईट गावात व परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांची अंतिम यात्रा गुरुवारी दि.२० नोव्हेंबर रोजी सकाळी ९:३० वा. त्यांच्या रहात्या घरून शेतामध्ये स्मशान भुमी येथे त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले एक मुलगी असा आप्त परिवार आहे. दैनिक मराठवाडा पत्र डोईफोडे यांच्या दु:खात सहभागी आहे.

### बीड-अहिल्यानगर महामार्गावर बिबट्याचा पुन्हा बिनधास्त संचार ; प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण



**कडा । प्रतिनिधी**

रात्री-अपरात्री प्रवास करताना जीव मुठीत धरा! बीड आणि अहिल्यानगर राज्य महामार्गावरून प्रवास करणाऱ्यांसाठी ही धोक्याची घंटा आहे. आष्टी वनपरिक्षेत्र हद्दीत बिबट्यांची संख्या वाढल्यामुळे आता ते शेत आणि लोकवस्तीसह थेट महामार्गावर येत असल्याचे वारंवार सिद्ध होत आहे. १९ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या दरम्यान कानिफनाथ घाटात बिबट्या पुन्हा एकदा प्रवाशांनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केला असून, हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. काही दिवसांपूर्वी १५ ऑक्टोबर रोजी याच घाटात बिबट्याचे दर्शन झाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. आता अवघ्या महिनाभरात १९ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या वेळी बिबट्या पुन्हा एकदा रस्त्यावर उतरल्यामुळे नागरिकांमध्ये मोठी भीती निर्माण झाली आहे. बिबटे हे निशाचर (रात्री सक्रिय) प्राणी आहेत. डोंगरपट्ट्यात त्यांचा नैसर्गिक अधिवास असला तरी, शिकारीसाठी ते लोकवस्तीकडे धाव घेतात. अनेक शेतकऱ्यांच्या शेळ्या, वासरे आणि श्वानांचा फडशा त्यांनी पाडला आहे. आता रस्त्यावर त्यांचा बिनधास्त संचार सुरू असल्याने प्रवाशांच्या जीवालाही धोका निर्माण झाला आहे. बिबट्यांचा उपद्रव वाढूनही वनविभाग कोणतीच ठोस उपाययोजना करत नसल्याबद्दल समाजसेवक परमेश्वर घोडके यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. परमेश्वर घोडके यांनी थेट सवाल केला आहे, वनविभाग केवळ शेळ्या, वासरे यांचा फडशा पाडल्यावर पंचनामा करून नुकसान भरपाई देते. पण ही नुकसान भरपाई देण्याऐवजी त्या बिबट्याचा बंदोबस्त करायला हवा. आज प्राण्यांचा जीव जातोय, उद्या माणसाचा जीव गेल्यानंतर तुमची मदत काय कामाची? अनेक वेळा मागणी करूनही वनविभागाकडून कसलीच उपाययोजना होत नाहीये. बिबट्यांचा बिनधास्त वावर पाहता, वनविभागाने याची गंभीर दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### सौ. के. एस. के. (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालयात मानसिक आरोग्य शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

सौ. के. एस. के. (काकू) अन्नतंत्र आणि कृषि महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मानसिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात विद्यार्थ्यांना ताण-तणाव व्यवस्थापन, सकारात्मक विचारसरणी, भावनात्मक समतोल राखणे, तसेच निरोगी विद्यार्थी जीवनासाठी आवश्यक कौशल्यांची माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाचे समन्वयन श्री. अतुल बडवे यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण पद्धतीने केले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मानसिक आरोग्याचे महत्व, त्याचे दैनंदिन जीवनातील फायदे, आणि स्व-जागरूकता कशी वाढवावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना मोठा लाभ झाला.